**<u>सेवानिवृत्ती प्राधान्य</u>**
**परिपत्रक**

जा.क्र.आस्था.२/सेनि/कोवि/२०२०/ 19134-50
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
दि. - 31 DEC 2020

**विषय :- वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांनी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणेबाबत - दि.२ जानेवारी २०२१ ते दि.१ जानेवारी २०२२**

उपरोक्त विषयास अनुसरुन सोबत जोडलेल्या यादीमधील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नांवासमोर दर्शविण्यांत आलेल्या नियत वयोमानानुसार वयाची ५८/६० वर्षे पूर्ण झालेल्या दिनांकास सेवानिवृत्त होत असल्यामुळे आपल्या पदाचा कार्यभार ते ज्या कार्यालयात काम करीत असतील तेथील अधिकाऱ्यांनी सूचित केलेनुसार अन्य कर्मचाऱ्यांकडे सोपवावा. तसेच त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास शासन सेवेतून सेवानिवृत्त व्हावे व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत जोडलेल्या तक्त्यातील कर्मचाऱ्यांच्या जन्मतारीख, सेवानिवृत्ती दिनांक यांच्या नोंदी या कार्यालयाकडे उपलब्ध असलेलया अभिलेखावरुन नमुद केल्या आहेत. परंतु त्यामध्ये काही तांत्रिक बदल (उदा.टंकलेखातील चूक) मुळ सेवापुस्तकातील नोंदीनुसार, अभिलेखातील नोंदीनुसार नसल्यास अशी बाब निदर्शनास आल्यास तसे निवेदन या कार्यालयाकडे सेवापुस्तकातील प्रथम पृष्ठासह १५ दिवसांचे आत आपल्या कार्यालय प्रमुखामार्फत सादर करावे. तसेच स्वेच्छा सेवानिवृत्ती, सक्तीची मुदतवाढ सेवानिवृत्ती, राजीनामा अन्य काही कारण असेल तरच सेवानिवृत्ती दिनांक अग्राह्य होईल. शासनाने ठरवून दिलेल्या तारखेसच नियत वयोमानानुसार शासन सेवेतून सेवानिवृत्त व्हावे लागेल. सेवानिवृत्ती आदेशाची पोहाच द्यावी.

तसेच सदर यादीमध्ये न दर्शविलेल्या परंतु दि.२ जानेवारी २०२१ ते दि. १ जानेवारी २०२२ कालावधीमध्ये सेवानिवृत्त होणारे कर्मचारी कार्यरत असतील तर त्यांची नावे जन्मतारीख, पदनाम माहितीसह तात्काळ या कार्यालयास सादर करावीत.

(सत्यवान सोनवणे)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत,

सर्व संबंधित कर्मचारी

प्रत माहितीसाठी सविनय सादर - मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी - सर्व संबंधित कार्यालय प्रमुख, दुय्यम कार्यालये,

२/- महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ च्या नियम १२० (२, ३) मधील तरतूदीनुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या संबंधातं निवृत्ती वेतन विषय कागदपत्रे तयार करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांवर सोपविण्यांत आली आहे.

कार्यालय प्रमुखांनी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवृत्ती वेतनाची कागदपत्रे तयार करुन मा.महालेखापाल, महाराष्ट्र-१ यांचेकडे निवृत्ती वेतन/उपदान/निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण इत्यादीच्या प्राधिकृतीसाठी पाठवावीत. मा.महालेखापाल यांनी या कागदपत्रांची आवश्यक ती तपासणी करुन प्रदान आदेश निर्गमित करावेत अशी तरतूद नियमान्वये करण्यांत आली आहे.

तथापी, सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती, रजा इत्यादी कार्यवाही वेळेत न पूर्ण झालेने त्यांचे सेवाविषयक कागदपत्रे पाठविण्यांस विलंब होतो. पर्यायाने सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांस त्यांचे सेवानिवृत्ती वेतन, उपदान, अंशराशिकरण, गटविमा योजना, शिल्लक रजा रोखीकरण व भविष्यनिर्वाह निधी इत्यादी देयकाच्या रक्कमा

वेळीच अदा न केल्याने संबंधित कर्मचारी मा.न्यायालयात अगर मा.लोक आयुक्त यांचेकडे तक्रार करतात व प्रसंगी खात्यावर विलंबाचा ठपका येतो व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी लागते.

सबब कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेळीच निवृत्ती वेतन मिळण्याविषयी कार्यालयामार्फत करावी लागणारी आवश्यक ती कार्यवाही वेळीच करावी. तसेच सेवानिवृत्ती नंतरचीही देयके त्यांना वेळीच अदा होतील याची दक्षता घेण्यांत यावी. ज्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सेवानिवृत्ती वेतन व उपदान वेळीच अदा करता येणे शक्य नसेल अशा कर्मचाऱ्यांची गटविमा, भविष्य निर्वाह निधी, शिल्लक रजा रोखीकरण इत्यादी देयकाच्या रकमा तात्काळ अदा करण्यांत याव्यात.

**दिनांक २ जानेवारी २०२१ ते दिनांक १ जानेवारी २०२२ अखेर**
**वर्ग- ३ मधील सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी**

| क्र. | कर्मचायांचे नांव | पदनाम | कार्यालयाचे नांव | जन्म तारीख | सेवानिवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री रमेश महादेव सावंत | मुख्य लिपिक | शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर | २४/०१/१९६३ | ३१/०१/२०२१ |
| २ | श्री नंदकुमार महादेव शिंदे | मुख्य लिपिक | शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर | १५/१०/१९६३ | ३१/१०/२०२१ |
| ३ | श्री सतिश शंकर पाटील | मुख्य लिपिक | वेतन व भ.नि.नि. पथक (माध्यमिक) कोल्हापूर | ०६/११/१९६३ | ३०/११/२०२१ |
| ४ | श्री कृष्णा तानू जाधव | कनिष्ठ लिपिक | वेतन व भ.नि.नि. पथक (प्राथमिक) सिंधुदुर्ग | ०१/०६/१९६३ | ३१/०५/२०२१ |
| ५ | श्री नारायण तुकाराम कोरडे | विजतंत्री नि पंपचालक | शासकीय विदयानिकेतन, पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा | ०१/०७/१९६३ | ३०/०६/२०२१ |

**दिनांक २ जानेवारी २०२१ ते दिनांक १ जानेवारी २०२२ अखेर**
**वर्ग- ४ मधील सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी.**

| अ. क्र. | कर्मचायांचे नांव | पदनाम | कार्यालयाचे नांव | जन्म तारीख | सेवानिवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री राजेंद्र पांडुरंग कांबळे | शिपाई | निरंतर शिक्षण कार्यालय, जि.प. सातारा | २१/०२/१९६१ | २८/०२/२०२१ |
| २ | श्री अशोक गुंडू सुतार | शिपाई | लेखापरीक्षण पथक (शिक्षण) सांगली | २५/०४/१९६१ | ३०/०४/२०२१ |
| ३ | श्री बापूशा दौलतराव नगराळे | शिपाई | शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर | ०१/०७/१९६१ | ३०/०६/२०२१ |

(सत्यवान सोनवणे)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर